# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/11/2022 (मंगळवार) सकाळ

## घरफोडी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०३ किमी अंतरावर इंदिरा नगर, धुमाल याच्या घराजवळ कन्हान दिनांक २५/१०/२०२२ चे ०९.०० वा. ते दिनांक १३/११/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. शांताबाई मोहन मोखरकर, वय ६० वर्ष, रा. इंदिरा नगर, धुमाल यांच्या घराजवळ कन्हान हे आपले घरी हजर असताना यातील फिर्यादी हिने दिवाळी च्या दिवशी लक्ष्मी पुजन केले त्यामध्ये १) चिकुहार ४ तोळे २) पोत १२ ग्रॅम ३) १ सोन्याची बांगडी १.५ तोळे ४) १ अंगठी १२ ग्रॅम ५) १ चैन ३ ग्रॅम ६) २ नग नथ वजनी १ तोळा ७) कानातील वेल व बेरी १ तोळे असा एकुण १०२ ग्रॅम वजनाचे जुने वापरते दागिने अंदाजे किमती २५५०००/— रू. लक्ष्मीपुजन झाल्यानंतर सर्व दागिने स्टीलच्या गोल डब्यात ठेवले व आलमारीला चाबी लावली व चाबी आलमारीच्या बाजूला लपवून ठेवली. फिर्यादी ही कपडे वाळविण्याकरीता घराचे छतावर गेली होती. फिर्यादीचे पती हे हॉल मध्ये झोपले होते. फिर्यादी ही कपडे वाळवून खाली आली असता फिर्यादी हिला आलमारीला चाबी लावून दिसली. फिर्यादी हिने आपले पती नामे—मोहन मोखरकर यांना विचारले की, ‘‘मी वर कपडे वाळविण्याकरीता गेली असता घरामध्ये कोणी आले होते काय’’ त्यावर त्यांनी उत्तर दिले की, ‘‘मी झोपलो होतो’’ सदरचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कन्हान येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कन्हान करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील बस स्टॉप काटोल येथे दिनांक १४/११/२०२२ चे १७.०० वा. ते १७.२० वा. सुमारास फिर्यादी नामे— मारोतराव चिंदुजी जुगसेनिया, वय ५२ वर्ष, रा. गोन्ही ता. काटोल हे गावी जाण्याकरीता बसस्टॉप काटोल येथे गोन्ही गावाला लागलेल्या बसमध्ये चढत असतांना कोणीतरी अज्ञात आरोपीने गर्दीचा फायदा घेवुन फिर्यादीचे चोर खिशात ठेवलेले ४१५००/— रूपयाचा बंडल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन काटोल करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**